MHKO180000252026

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.०८/२०२६ मधील</u>**

**<u>निशाणी क्र.२३ खालील आदेश.</u>**

**<u>[सिकंदर बंडू मुजावर व इतर वि. मुज्ञमिल मेहबूब शेख व इतर]</u>**

वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश VI नियम १७ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. वादींच्या विद्यमान वकीलांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे नमूद केले आहे की, प्रस्तुतचा दावा कायम व आज्ञार्थी मनाईकरीता दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतचे प्रकरण दाखल करतेवेळी दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यातील परिच्छेद क्र.१ यामध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये दावा मिळकतीची जागेवरील वस्तूस्थिती दर्शविणारा समजूतीचा हातनकाशा सोबत जोडल्याचे वादींनी नमूद केले असले तरी, सदरचा हातनकाशा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यासोबत जोडण्याचे वादींकडून नजरचुकीने व अनावधानाने राहून गेले आहे. प्रस्तुत दावा दाखल केल्यानंतर वादींना उपरोक्त नमूद चुक अवगत झाली. उपरोक्त नमूद चूक अनावधानाने व नजरचुकीने झालेली असल्यामुळे त्याबाबत दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यामध्ये योग्य ती दुरुस्ती करुन दावा मिळकतीचा हातनकाशा दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यासोबत जोडण्याकरीता वादींना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. प्रस्तुत नमुद दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, सदर दुरुस्ती न केल्यास वादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात यावा, अशी विनंती वादींनी केली आहे.

०३. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत दाव्याचे काम लांबविण्याच्या हेतूने वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश करण्याची विनंती केली आहे.

०४. दावा, प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत, प्रस्तुत अर्ज व त्यावर प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन करण्यात आले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यासोबत दावा मिळकतीचा हातनकाशा जोडण्याचे वादींकडून नजरचुकीने व अनावधानाने राहून गेल्यामुळे

सदरची त्रुटी दुरुस्त करण्याकरीता वादींना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यांचा गुणवत्तेवर निकाल लावण्याकरीता आवश्यक असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे. तसेच, वादींना प्रस्तुत अर्जामधील प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याच्या स्वरुपाचे कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित होईल. वादींना प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब विचारात घेता, प्रस्तुतचा अर्ज तीनशे रुपये इतक्या खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :–

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये ३००/– (अक्षरी रक्कम रुपये तीनशे फक्त) इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यामध्ये प्रस्तुत अर्जातील नमुद दुरुस्ती करुन दुरुस्त दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यांची प्रत प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल करावी. तसेच, दुरुस्त दावा व तुर्तातूर्त मनाई अर्ज (निशाणी क्र.५) यांची प्रत्येकी एक प्रत प्रतिवादींना द्यावी.

३. वादींनी खर्चाची रक्कम रुपये ३००/– (अक्षरी रक्कम रुपये तीनशे फक्त) प्रतिवादी क्र.१ यांना द्यावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.01.28 17:20:44 +0530

दिनांक : २८.०१.२०२६ (बाळासाहेब श्री. गायकवाड)

कुरुंदवाड. प्रभारी सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कुरुंदवाड.